ePaper

# दोन वर्षांत देशातून डावा दहशतवाद हद्दपार: अमित शहा



| वर्ष - 7 । अंक - 150 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- भारताचे हॉकीत सुवर्ण युग!
- आमीरच्या मुलीचे कौतुक
- आमदारांना संपूर्ण भाषण स्वातंत्र्य!
- दादा गटाचा शरद पवारांवर निशाणा!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 7 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# महापालिकेत ‘पवार पॅटर्न’!

## »अजित पवार गटाला ऊर्जा : अधिकाऱ्यांच्या दालनात पदाधिकाऱ्यांचा राबता

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यंत्री देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये सामील होत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पद स्वीकारले. तर आता पुणे जिल्ह्याचं पालकमंत्रीपदही मिळालं. त्यामुळे पुन्हा सत्तेत आल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा अजित पवार गट महापालिकेत सक्रिय झाला आहे. शहराध्यक्षांसह पदाधिकारी व माजी नगरसेवकांचा महापालिकेत राबता वाढला आहे.**



महाविकास आघाडीत अजित पवार मुख्यमंत्री होते. त्या काळात राष्ट्रवादी महापालिकेत 'ॲक्शन मोड'मध्ये होता. मात्र, सत्तांतर होऊन शिंदे यांचे सरकार राज्यात आल्याने राष्ट्रवादीचा उत्साह मावळला होता. पालिकेतील अनेक कामांत गैरव्यवहार झाल्याचा आरोप करीत राष्ट्रवादीने आंदोलन उभारले होते.

शहराला भेट देत उपमुख्यमंत्री पवार यांनी महापालिकेत २५ ऑगस्टला आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या समवेत आढावा बैठक घेतली. तसेच, कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. आयुक्त शेखर सिंह यांनाही त्यावेळी अजित पवार यांनी काही कानमंत्र दिले होते. त्यामुळे महापालिकेत पक्षाचे शहराध्यक्ष, पदाधिकारी व माजी नगरसेवकांच्या चकरा वाढल्या आहेत. आपल्या प्रभागातील रखडलेली कामे करून घेण्यात ते आग्रही दिसत आहेत. पालिकेत न फिरकणारेही आता पालिका भवनात अधिकाऱ्यांच्या दालनात दिसत आहेत.

### अधिकारी म्हणतात... वेगात कामे होतील!

»महापालिकेचे काही अधिकारीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महापालिकेत लक्ष घातल्याने खासगीत समाधान व्यक्त करीत आहेत. पवार यांच्या कामाचे नियोजन व अनुभव पालिकेच्या बऱ्याच अधिकाऱ्यांना आहे. त्यामुळे ते आता रखडलेली कामे व प्रकल्प वेगात मार्गी लागतील, असा विश्वास व्यक्त करीत आहेत.

# शहरातील नवमतदारांचा कौल कुणाला?

## » मतदार नोंदणी अभियान: शहरात एकूण 18 हजार 312 नवीन मतदार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील चिंचवड विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक ८ हजार ७२२ नवमतदारांची भर पडली आहे. त्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत. तर, भोसरी मतदारसंघात ६ हजार ११२ आणि पिंपरी मतदारसंघात ३ हजार ४७८ नवमतदार झाले आहेत.**



शहरातील तीन मतदारसंघात एकूण १८ हजार ३१२ मतदार वाढले आहेत. तर, मयत व दुबार असलेले एकूण २ हजार ३०१ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या मतदार पुनर्निरीक्षणाच्या कार्यक्रमातंर्गत गेल्या ९ महिन्यात २१ मतदारसंघात एक लाख ६० हजार मतदारांचे बदल अर्ज स्वीकारण्यात आले आहेत. त्यामुळे वाढीव मतदारांचा कौल कोणत्या पक्षाला मिळणार याबाबत राजकीय तर्कवितर्क सुरु आहेत.

चिंचवडमध्ये १ हजार २७ मतदारांची दुबार व मयत नावे वगळण्यात आली आहेत. त्या पाठोपाठ भोसरी मतदारसंघात ६ हजार ११२ नवीन मतदार झाले आहेत. एकूण ८७८ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. तर, ५ हजार २८१ जणांच्या नावात दुरुस्ती करण्यात आली. एकूण १२ हजार २७१ अर्ज करण्यात आले होते. तर, पिंपरी मतदारसंघात ३ हजार ४७८ जणांनी नोंदणी केली आहे. एकूण ३९६ जणांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली. तीन हजार १ मतदारांच्या नावात दुरुस्ती करण्यात आली. या मतदार संघातून एकूण ६ हजार ८७५ अर्ज प्राप्त झाले आहेत.

### चिंचवडमध्ये सर्वाधिक मतदारांची नोंद...

» मतदार अद्ययावत करण्यासाठी मतदारांच्या दुरस्ती करण्यात आली आहे. घरोघरी जाऊन पडताळणी करण्यात येत आहे. नव्या वर्षात ५ जानेवारीला अद्ययावत मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. या मोहिमेत राज्यात क्रमांक दोनचा सर्वात मोठा मतदारसंघ असलेल्या चिंचवड विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक ८ हजार ७२२ नवमतदारांची नोंद झाली आहे. त्यांना येत्या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता येणार आहे.

# शहरातील रस्ते दुरुस्तीची कामे ठप्प!

## येरवड्यातील ‘हॉटमिक्स’ प्रकल्प नादुरुस्त

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पावसाने उघडीप दिल्याने रस्ते दुरुस्ती युद्धपातळीवर करण्याच्या महापालिकेच्या मनसुब्यावर येरवड्यातील हॉटमिक्स प्रकल्प पुन्हा नादुरुस्त झाल्याने पाणी फिरले गेले आहे. हॉटमिक्स प्रकल्प नादुरुस्त झाल्याने रस्ते दुरुस्तीची प्रक्रिया ठप्प झाली असून, पुढील काही दिवस वाहनचालक आणि पादचाऱ्यांना खड्ड्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागणार आहे.**

रस्ते आणि खड्डे दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या डांबरमिश्रीत खडीसाठी (हॉटमिक्स) येरवडा येथे हॉटमिक्स प्रकल्प महापालिकेकडून उभारण्यात आला आहे. शहराचे क्षेत्रफळ २५० चौरस किलोमीटर असताना या प्रकल्पामधून पुरेसे हॉटमिक्स उपलब्ध होत होते. मात्र, गेल्या काही वर्षात शहराचा विस्तार झपाट्याने झाला आहे. महापालिका हद्दीत ३४ गावांच्या समावेशामुळे भौगोलिक क्षेत्र ५१९ चौरस किलोमीटर एवढे झाले आहे. त्यामुळे कच्चा माल तयार करण्याचा संपूर्ण भार हा येरवडा येथील हॉटमिक्स प्रकल्पावर आहे. त्यामुळे रस्ते दुरुस्तीची वेळ आल्यानंतर ऐन मोक्याच्या क्षणी प्रकल्प बंद पडत आहे. ऑगस्ट महिन्यात हा प्रकल्प तीन वेळा बंद पडला होता.



त्यानंतर प्रकल्पाचे कंट्रोल पॅनेल नादुरुस्त झाल्याने डांबरमिश्रीत खडी उपलब्ध होण्यास मर्यादा आल्या आहेत. रस्त्यांवरील खड्डे सात दिवसांच्या आता बुजवावेत, असे आदेश महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी गणेशोत्सवानंतर दिले होते. ही मुदत शनिवारी (७ ऑक्टोबर) संपणार आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून पथ विभागाबरोबरच क्षेत्रीय कार्यालयांकडून खड्डे बुजविण्याला प्रारंभ करण्यात आला आहे. त्यासाठी डांबरमिश्रीत खडीची मागणी करण्यात आली आहे. मात्र, प्रकल्प बंद असल्याने ती पूर्ण झालेली नाही. सध्या ७० ते ७५ टन एवढी डांबरमिश्रीत खडी या प्रकल्पातून उपलब्ध होत आहे. या प्रकल्पामधून प्रतिदिन सरासरी ५०० टन डांबरमिश्रीत खडी तयार केली जाते. महापालिकेचा पथ विभाग आणि १५ क्षेत्रीय कार्यालयाला प्रत्येकी १० टन या प्रमाणे १५० टन डांबरमिश्रीत खडी दिली जाते. पावसाने उघडीप दिली असल्याने खड्डे दुरुस्तीला गती येईल, असे वाटत असतानाच खड्डे दुरुस्तीची प्रक्रिया मात्र ठप्प झाली आहे.

### चारही बाजूला हॉटमिक्स प्रकल्प ?

महापालिका हद्दीत ३४ गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शहराची भौगोलिक हद्दही वाढली आहे. समाविष्ट गावातील रस्त्यांची दुरुस्तीही महापालिकेला करावी लागत आहे. येरवडा येथील प्रकल्पावर ताण येत असल्याने काही वर्षांपूर्वी शहराच्या चारही बाजूला हॉटमिक्स प्रकल्प उभारण्याचे नियोजित होते. स्थायी समितीच्या बैठकीत तसा निर्णयही झाला होता. मात्र, या निर्णयाची अंमलबजावणी अद्यापही झालेली नाही. रस्ते आणि खड्डे दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या डांबरमिश्रीत खडीसाठी (हॉटमिक्स) येरवडा येथे हॉटमिक्स प्रकल्प महापालिकेकडून उभारण्यात आला आहे. शहराचे क्षेत्रफळ २५० चौरस किलोमीटर असताना या प्रकल्पामधून पुरेसे हॉटमिक्स उपलब्ध होत होते. मात्र, गेल्या काही वर्षात शहराचा विस्तार झपाट्याने झाला आहे. महापालिका हद्दीत ३४ गावांच्या समावेशामुळे भौगोलिक क्षेत्र ५१९ चौरस किलोमीटर एवढे झाले आहे. त्यामुळे कच्चा माल तयार करण्याचा संपूर्ण भार हा येरवडा येथील हॉटमिक्स प्रकल्पावर आहे.

# पुणे मेट्रो वारंवार का बंद पडतेय?

## मेट्रो मार्गात तांत्रिक बिघाडाचा खोडा सुरू

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे मेट्रो मार्गात सध्या तांत्रिक बिघाडाचा खोडा सुरू आहे. मागील सलग दोन दिवसांत मेट्रो सेवा काही काळ बंद पडली होती. त्यामुळे प्रवाशांचे हाल झाले. वारंवार घडणाऱ्या या घटनांची चौकशी महामेट्रोने सुरू केली असून, भविष्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. रुबी हॉल ते वनाझ मार्गावरील मेट्रो सेवा मंगळवारी (ता. ३) अचानक अर्धा तास खंडित झाली होती. या मार्गावरील मेट्रो २१ मिनिटे नळस्टॉप स्थानकावर थांबून होती.**

मेट्रोच्या ओव्हरहेड केबलला पक्षी धडकल्याने वीजपुरवठा खंडित होऊन सेवा बंद झाल्याचे समोर आले होते. त्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी बुधवारी (ता. ४) मेट्रोच्या गाडीत तांत्रिक बिघाड झाला. गाडी काही मिनिटे विलंबाने आली; परंतु, ती अतिशय संथ गतीने आली. प्रवाशांनी आतमध्ये जाण्यासाठी दरवाजासमोर गर्दी केली. परंतु, ते उघडले नाहीत. अखेर काही वेळाने दरवाजे न उघडता मेट्रो पुढे गेली.



### अतिशय संथ गतीने आली पुणे मेट्रो

मेट्रोच्या ओव्हरहेड केबलला पक्षी धडकल्याने वीजपुरवठा खंडित होऊन सेवा बंद झाल्याचे समोर आले होते. त्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी बुधवारी (ता. ४) मेट्रोच्या गाडीत तांत्रिक बिघाड झाला. गाडी काही मिनिटे विलंबाने आली; परंतु, ती अतिशय संथ गतीने आली. प्रवाशांनी आतमध्ये जाण्यासाठी दरवाजासमोर गर्दी केली. परंतु, ते उघडले नाहीत. अखेर काही वेळाने दरवाजे न उघडता मेट्रो पुढे गेली.

त्यानंतर काही मिनिटांनी आलेल्या दुसऱ्या मेट्रोने प्रवाशांना प्रवास करावा लागला.

मेट्रोची विस्तारित सेवा सुरू झाल्यापासून वारंवार तांत्रिक बिघाड होत आहेत. त्यामुळे आता मेट्रोने बुधवारी झालेल्या प्रकाराची चौकशी सुरू केली आहे. महामेट्रोचे कार्यकारी संचालक हेमंत सोनावणे म्हणाले, की मेट्रो गाडीच्या दरवाजाच्या सेन्सरमध्ये समस्या निर्माण झाल्याने बुधवारी तांत्रिक अडचण निर्माण झाली. मेट्रोत एखादा तांत्रिक बिघाड झाल्यास प्रत्येक विभागाची शीघ्र प्रतिसाद पथके आहेत. जिथे बिघाड झाला असेल, तिथे ती तातडीने पोहोचून दुरुस्ती करतात. तांत्रिक बिघाड झाल्यास त्याच्या कारणांची चौकशी केली जाते. याचबरोबर संबंधितांना याबाबत विचारणाही केली जाते. आगामी काळात अशा घटना घडू नयेत, यासाठी पावले उचलली जात आहेत. “मेट्रोची यंत्रणा अजून नवीन आहे. त्यात होणारे बिघाड तातडीने दुरुस्त केले जात आहे. ओव्हरहेड वायरला पक्षी धडकणे आपण टाळू शकत नाही. त्यामुळे विद्युतपुरवठा खंडित होतो. त्यानंतर १० मिनिटांत यंत्रणा पूर्ववत केली जाते. हा वेळ आणखी कमी करण्याचा आमचा प्रयत्न आहे”, असे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी म्हटले आहे.

# विद्यापीठात ७५ आयुर्वेदिक वनस्पतींचे अमृत उद्यान!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने विद्यापीठात अमृत उद्यानाची निर्मिती करण्यात येणार आहे. हतीखान्याच्या सरोवराजवळ साकारत असलेल्या या उद्यानात ७५ आयुर्वेदिक वनस्पतीची लागवड करण्यात येणार आहे. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी वृक्षारोपण करून अमृत उद्यान निर्मिती उपक्रमाचा प्रारंभ केला. प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. महेश काकडे, वित्त व लेखा अधिकारी चारुशीला गायके, विद्यापीठ सल्लागार समितीचे सदस्य राजेश पांडे या वेळी उपस्थित होती. विद्यापीठाने अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. राजेंद्र विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने उद्यान निर्मितीचा प्रस्ताव मांडला होता. कुलगुरूंनी या प्रस्तावाला मान्यता दिली. त्यानुसार आता या उद्यानाची निर्मिती करण्यासाठी ७५ आयुर्वेदिक वनस्पतींचे रोपण करण्यात आले. डॉ. गोसावी म्हणाले, की आयुर्वेदिक वनस्पती उद्यान हे अनोखे ठरणार आहे. वनस्पतीशास्त्र किंवा विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वनस्पतींची गरज असते. त्यामुळे स्वतःचे उद्यान असावे ही कल्पना होती.

त्यामुळे हा परिसर चांगल्या पद्धतीने विकसित होईल. उद्यानातील वनस्पती उद्यानामध्ये ७५ आयुर्वेदिक आणि देशी वनस्पतींचा समावेश आहे. त्यात रुद्राक्ष, पळस, अर्जुन, शिकेकाई, हिरडा, बेहडा, रिठा, कदंब, कापूर, आवळा, शमी, सीताअशोक, गुग्गुळ, मेहंदी, बेल, आपटा, बकुळ, अजानवृक्ष, नागकेशर, उंबर, रोहितक, डिकेमाळ, चारोळी, करंज, काटेसावर, शिसम, कडुनिंब, बूच, कृष्णवड, बिब्बा, कांचन, सुरंगी, कुसुम, मुरुडशेंग, गोरखचिंच, पांगारा, सेंद्री, मंदार, आपटा, भोकर, खैर, रक्तचंदन, अंजन, पुत्रांजीवा, तुती, कैलास्पती, लक्ष्मीतरू अशांचा समावेश आहे.

# पिंपरी-चिंचवडमधील मोशीत उभारणार ‘आयआयएम’ ची शाखा!

## आयुक्त शेखर सिंह यांचा जिल्हा प्रशासनाला प्रस्ताव

### आमदार महेश लांडगे यांच्या मागणीनंतर हालचालींना वेग

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिक्षण क्षेत्रातील केंद्र सरकारची महत्त्वपूर्ण संस्था इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (IIM) ची शाखा पिंपरी-चिंचवडमधील मोशी येथे उभारण्याच्या हालचाली सुरू आहेत. तसा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवला आहे. तसेच, जिल्हा प्रशासनाने संबंधित संस्थेलाही पत्र पाठवले आहे.**



पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील नामांकीत शिक्षण संस्थेत शिक्षण घेण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे. तसेच, रोजगार आणि उद्योजकता याला चालना मिळावी. या संकल्पनेतून इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट या संस्थेची शाखा शहरात व्हावी. त्यासाठी जागा उपलब्ध करावी आणि पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करुन संबंधित संस्थेकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली होती. त्यानुसार महापालिका प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे.

मोशी येथील ६० एकर शासकीय जागेत आयआयएम-नागपूर संस्थेची विस्तारीत शाखा सुरू करण्याबाबत चाचपणी सुरू आहे. या ठिकाणी शासकीय गायरान जागेमधून १२ मीटर एक आणि १८ मीटरचे तीन रस्त्यांचे नियोजन आहे. सदर जागा पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडे हस्तांतरीत करण्यासाठी प्रस्ताव पाठवला आहे. ६० एकर जागेत आयआयएम उभारण्याचा विचार आहे. याबाबत वैधानिक कार्यवाही करुन शासनाची मंजुरी मिळावी, असे सकारात्मक पत्र महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठवले आहे.

#### पिंपरी-चिंचवडची ओळख जगाच्या नकाशावर...

एकेकाळी कचरा डेपोचा परिसर म्हणून उल्लेख केला जाणाऱ्या मोशीला राष्ट्रीय स्तरावरील शिक्षणसंस्थेचे ठिकाण म्हणून ओळख प्राप्त होण्याची शक्यता आहे. यापूर्वीच महाराष्ट्रातील पहिले जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ टाळगाव चिखली येथे कार्यान्वयीत झाले. पिंपरी-चिंचवड न्यायालयाची अत्याधुनिक सोयी-सुविधांची भव्य इमारत मोशीत उभारले जात आहे. विशेष म्हणजे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची शाखाही शहरात होत आहे. आता आयआयएम संस्था शहरात झाल्यास पिंपरी-चिंचवडची ओळख जगाच्या नकाशावर ठळकपणे अधोरेखित होणार आहे.

#### ‘आयआयएम’ करणार जागा मागणी प्रस्ताव...

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने केलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर इंडियन इन्स्टिट्यूट संस्थेने विहित नमुन्यात अ, ब, क, ड तक्त्यात जागा मागणी प्रस्ताव अपर तहसिलदार पिंपरी-चिंचवड यांच्या कार्यालयास करावा. ज्यामुळे पुढील कार्यवाही करणे सोईचे हाईल, असे पत्र निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नागपूर यांना पाठवले आहे. या संस्थेकडून जागा मागणी प्रस्ताव आल्यानंतर जागेचे पाहणी होईल. त्यानंतर आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करुन शाखा विस्तारासाठी चालना मिळणार आहे.**



“ जिल्हा प्रशासनाने आयआयएम संस्थेला पत्रव्यवहार केला आहे. त्यानुसार जागा मागणी प्रस्ताव मिळाल्यानंतर पिंपरी-चिंचवड अपर तहसिल कार्यालयामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल. पुणे पिंपरी-चिंचवड आणि मुंबई अशी मोठी शहरे, औद्योगिक पट्टा, आयटी हब यासह भविष्यातील शहरांचे वाढते नागरीकरण याचा विचार करता ‘कनेक्टीव्हीटी’च्या दृष्टीने मोशीतील गायरान जागेत आयआयएम संस्थेचे शाखा उभारणे शहराच्या हिताचे आहे.त्यानुसार,राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही पाठपुरावा करणार आहोत.

**- महेश लांडगे,**
आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# महापालिका रुग्णालयांमधील सेवा-सुविधांबाबत ‘ऑडिट’ करा!

## दीपक मोढवे-पाटील यांची मागणी : महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नांदेड, ठाणे आणि नागपूर येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिका रुग्णालयांमधील औषध साठा, सेवा-सुविधांबाबत ‘ऑडिट’ करा आणि रुग्णांना चांगल्या सुविधा मिळतील, याची काळजी घ्या, अशी मागणी भाजपा वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष दीपक मोढवे-पाटील यांनी केली आहे.**




याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, गेल्या काही दिवसांपासून राज्यातील शासकीय रुग्णालयातील रुग्णांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ठाणे, नांदेड, छत्रपती संभाजीनगर या महाराष्ट्रातल्या शासकीय रुग्णालयांमध्ये मृत्यूचे तांडव सुरु आहे. नांदेडच्या शासकीय रुग्णालयात ३१ जणांचा मृत्यू झाला आहे. नांदेडची ही घटना ताजी असतानाच नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात ४३, तर मेयो रुग्णालयात १६ असे एकूण ५९ मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.या पूर्वी ऑगस्ट मध्ये ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात एका रात्रीत तब्बल १८ रुग्णांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. प्रचंड अनागोंदी, गोंधळ, अपुरी डॉक्टर क्षमता आणि रुग्णांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ यामुळे ही घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे.

राज्यातील या तीनही घटना पाहता पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील आरोग्य व्यवस्था, सेवा-सुविधा यांचा आढावा घ्यावा. या रुग्णालयात पिंपरी-चिंचवड शहरासह, पुणे आणि इतर जिल्ह्यातील रुग्ण उपचारासाठी येत आहेत. नियमित दीड हजारापेक्षा अधिक रुग्ण उपचारासाठी दाखल होत असल्याची नोंद आहे. रुग्णालयावर उपचाराचा अतिरिक्त ताण येत आहे. यासह महापालिकेच्या विभागीय दवाखान्यात दाखल होणाऱ्या रुग्णांची संख्या मोठी आहे. त्यामुळे औषध साठा, उपलब्ध मनुष्यबळ, अत्याधुनिक यंत्रणा याचे प्रशासनाने ऑडीट करावे, अशी आमची आग्रही मागणी आहे, असे दीपक मोढवे-पाटील यांनी म्हटले आहे.



“ शहराची आरोग्यवाहिनी असलेल्या वायसीएम रुग्णालयात तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करावी. रुग्णालयात रेडिओलॉजिस्टचा अभाव आहे. ते येण्यासाठी प्रयत्न करावेत. या बरोबरच सोनोग्राफी, एक्स-रे साठी अत्याधुनिक मशिनरीचा पुरवठा करावा. वर्ग १ ते वर्ग ४ ची सर्व रिक्त पदे भरावीत. याबरोबरच महापालिकेच्या इतर रुग्णालयांना वायसीएम प्रमाणे आणखीन सुसज्ज बनवून सुविधा द्याव्यात. त्यामुळे वायसीएमचा ताण कमी होऊन दुर्घटना टाळण्यास मदत होईल. या सर्व घटनांचा गांभीर्यपूर्वक विचार करून पाऊले टाकावीत, अशी मागणी प्रशासनाला केली आहे.

**- दीपक मोढवे-पाटील, ,**
शहराध्यक्ष, वाहतूक आघाडी, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# धनगर आरक्षणाच्या आंदोलनाआधी...




**मराठा आरक्षणाच्या जालन्यामधील लाठीमारापर्यंत गेलेल्या आंदोलनानंतर, ओबीसींनी आंदोलनाचा इशारा दिला. आता धनगरांना भडकवलं जातंय. महाराष्ट्रातील मतदार दूधखुळा नाही. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समाजासमाजात ध्रुवीकरण करून, पक्षाला फायदा मिळवून देण्यासाठी आता सत्तेतील आमदारच सरकारविरोधात आंदोलनाची भाषा करू लागलेत.**



भाजपचे आमदार गोपिचंद पडळकर यांच्या वक्तव्याचा नीट अभ्यास करायला हवा. त्याची पार्श्वभूमी समजून घ्यायला हवी. आरक्षणाच्या मोहासाठी राज्यातील मोठा समाज असलेला धनगर समाज, अशा आंदोलनाचा भाग झाला तर, राजकारण्याचं फावेल पण तरुणांच्या डोक्यावर पोलिस स्टेशनच्या फेऱ्या आणि केसेस पडतील. राजकारण्यांचे हे डाव समजून घ्यायला हवेत. पडळकरांनी सत्तेत राहून, आंदोलन करण्यापेक्षा पक्षाच्या नेत्यांना खडसावून विचारायला हवं. धनगर समजाच्या आरक्षणाच्या नावानं शंख फुंकणाऱ्या आमदार गोपिचंद पडळकर यांचा राजकीय इतिहासही समजून घ्यायला हवा. याच धनगर आरक्षणासाठी पडळकरांनी याआधीही राज्यव्यापी लढा उभारला होता. त्यावेळी धनगर समाजाने त्यांना भरभरून साथही दिली. लाखोंच्या संख्येने पडळकरांच्या पाठीशी धनगर समाज उभा राहिला. त्यासाठी पडळकर भाजपातून बाहेर पडले. समाजातल्या लोकांना 'भाजपने आरक्षण नाही दिले तर त्यांना मत देऊ नका. माझा बाप, आई, भाऊ किंवा मी जरी उभा राहिलो तरीही भाजपाला मत देऊ नका!' असं आवाहन करत त्यांनी समाजाला बिरोबाची शप्पथ घातली होती. त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणूकीत पडळकरांनी वंचित बहूजन आघाडीची उमेदवारी घेतली. भाजपावर खरपूस टीकाही केली. निवडणूका झाल्यावर मात्र पडळकर पुन्हा भाजपवासी झाले.

विधानसभेला भाजपाच्याच उमेदवारीवर बारामती मतदारसंघातून लढले. बिरोबाला अंधारात ठेवून, भाजपासाठी स्वत:च मतं मागू लागले. फडणवीसांचे अत्यंत लाडके, निष्ठावंत आणि जवळचे अशी पडळकरांची ख्याती आहे. राज्यात आणि देशात सध्या त्यांच्या पक्षाचीच सत्ता आहे. मुख्यमंत्री जरी एकनाथ शिंदे असले किंवा अजित पवार उपमुख्यमंत्री असले तरी राज्यातल्या सत्तेची खरी चावी माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्याच हातात आहे. हे अवघ्या राज्याला माहिती आहे. बाकी केंद्रात मोदी म्हणजे भाजपाच सबकुछ असताना पडळकरांना समाजाच्या आरक्षणासाठी जाट आंदोलनासारखे तीव्र आंदोलन करण्याची गरज का लागली आहे? आमची सत्ता येताच आम्ही धनगर समाजाला आरक्षण देऊ!' असं खुद्द देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते. त्यांनी धनगर समाजाला तसा शब्दही दिला होता. आता राज्यात आणि देशातही भाजपाची प्रचंड बहुमताची सत्ता आहे. भाजपाने ठरवले तर ते देऊ शकतात धनगर समाजाला हवे असलेले आरक्षण. मग पडळकर हे भाजपाचे आमदार आहेत. त्यांचा पक्षावर, फडणवीसांच्यावर आणि मोदींच्यावर दांडगा विश्वास आहे. असे असताना गोपिचंद पडळकरांनी समाजाला रस्त्यावर उतरवण्यापेक्षा आपल्याच सरकारला व नेत्यांना जाब विचारावा. 'आरक्षण देतो', असा शब्द दिलेल्या देवेंद्र फडणवीसांची कॉलर पकडावी. जो काय राडा घालायचा तो विधान परिषदेत, पक्षाच्या बैठकीत घालावा. पक्ष आरक्षण देणार नसेल तर भाजपाचा त्याग करावा. देवेंद्र फडणवीस आणि भाजपवाले लबाड आहेत, त्यांनी धनगर समाजाला फसवले असे जाहिर करावे मग आंदोलनाची घोषणा करावी. राज्यातल्या सत्तेत पडळकर आमदार आहेत. त्यांचे नाव संभाव्य मंत्री म्हणून चर्चेत येते असे असताना समाजातल्या युवकांना रस्त्यावर उतरवू नये. आंदोलनात भाग घेतलेल्या युवकांवर अकारण केसेस पडतील, गुन्हे दाखल होतील असा आततायी निर्णय पडळकरांनी घेवू नये. बिरोबाची शप्पथ मोडली म्हणून, बिरोबा केस नाही घालणार. तो तुम्हाला समजूनच घेईल पण सरकारच्या विरोधात जाट आंदोलनासारखे तीव्र आंदोलन केले, तर तुमचेच सरकार समाजाच्या युवकांच्यावर केसेस घालेल. त्यांना कोर्टाच्या वा-या करायला भाग पाडेल. हातावरची पोटं असलेल्या, भटकंती करत पोट भरणा-या समाजातल्या युवकांना अडचणीत आणण्यात कसले शहाणपण?

## संपादकीय »

### भाजपचे पालक!

***अजितदादा पवार यांना हवे होते ते पुणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मिळाले याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे की ते ज्यांच्या हातून गेले त्या चंद्रकांतदादा पाटील यांच्याविषयी दु:ख, कणव इत्यादी सहवेदना व्यक्त करावी हा तसा गंभीरच प्रश्न.***

अजितदादा पवार यांना हवे होते ते पुणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मिळाले याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे की ते ज्यांच्या हातून गेले त्या चंद्रकांतदादा पाटील यांच्याविषयी दु:ख, कणव इत्यादी सहवेदना व्यक्त करावी हा तसा गंभीरच प्रश्न. दोघेही दादा. त्यात चंद्रकांतदादा तर भाजपचे कर्ते-धर्ते अमित शहा यांच्याशी सासुरवासीय सख्य राखून असलेले. पण तरी त्यांना डावलून अमितभाईंनी अजितदादांकडे पुण्याचे पालकमंत्रीपद दिले यामुळे दादांच्या (चंद्रकांत) मनास किती यातना झाल्या असतील याची कल्पना अतुल भातखळकर किंवा तत्समच करू शकतील. शेवटी 'घर की मुर्गी दाल बराबर' हेच खरे! (भातखळकरांनी मुर्गीच्या जागी तुरीची डाळ आणि 'दाल'च्या जागी केशरी दाल असे वाचावे!)

**कधी कधी स्वत:वर, तर कधी परिस्थितीवर रडावसं वाटतं. ज्या ठिकाणी आपण आनंद घेण्यासाठी जातो त्या सर्व ठिकाणांची आजची स्थिती किती भीषण झाली आहे. एखादं पर्यटनस्थळ असो की तीर्थक्षेत्र. एखादा सण असो की मनोरंजनाचा कार्यक्रम. गर्दी हा त्याचा अत्यावश्यक भाग बनलाय. आज मार्केटिंगमुळे गर्दी हे पैसे देणारं साधन आहे. पण याच गर्दीमुळे निसर्गाचा तोल ढासळतोय.**

# पर्यटकांच्या गर्दीला युरोप नाही म्हणतंय

कुठं जंगलात पेटलेले वणवे, कुठं अतिवृष्टीने आलेले महापूर, कुठे ढगफुटी, कुठे कोरड्या नद्या. ही परिस्थिती गंभीर आहे आणि वर्षानुवर्षे ती अधिक गंभीर होत आहे. नैसर्गिक आपत्ती ही नवीन गोष्ट नाही. हजारो-लाखो वर्षांचा इतिहास पाहिल्यास, त्या नेहमीच घडत आल्या आहेत; पण त्यांची तीव्रता आणि वारंवारता ज्याप्रकारे वाढली आहे, ती यापूर्वी कधीही दिसली नव्हती. विशेषतः यंदाचे वर्ष तर यामध्ये सर्वात चिंताजनक ठरले. नैसर्गिक आपत्तींचा फटका नैसर्गिक साधनसंपत्तीला बसत आहे, तसेच मानव आणि प्राण्यांवरही आपत्ती कोसळत आहेत.

हिमाचल प्रदेश, उत्तराखंडपासून ते आसामपर्यंत आणि कोकणापासून ते सातासमुद्रापार युरोपीय देशांपर्यंत सर्वत्र हीच स्थिती पाहायला 'मिळत आहे. घरे, इमारती, गाड्या, शेते, धान्यांची कोठारे, पशुधन सर्व काही या आपत्तींच्या तडाख्यात नष्ट होत आहे. चौपदरी महामार्ग, पूल, बंधारे, वीज प्रकल्प हे



सगळे तुटून वाहून गेले. कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले, शेकडो जीव गेले. संकटे आकाशातून आली आहेत; पण ती घडवण्यात मानवाचा हात मोठा आहे. पर्यटन स्थळांवरील बेसुमार प्रचंड गर्दी, वाहनांची प्रचंड रेलचेल, या प्रवाशांसाठी उभी केली जात असलेली घरे-हॉटेल्स-गेस्ट हाऊसेस-रिसॉर्टस् आणि बाजारपेठा या सर्वांमुळे छोट्या हिल स्टेशन्सचे मोठ्या शहरात रूपांतर झाले आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत जिथे काही शेकडो लोक जायचे, तिथे आज लाखांच्या संख्येने पर्यटक जात आहेत. या सगळ्या बाबींमुळे आजघडीला परिस्थिती इतकी भीषण बनली आहे की, युरोपियन लोक पर्यटकांना मज्जाव करू लागले आहेत. युरोपातील अनेक देश पुरे झाले, दया करा, आता येऊ नका, असा सूर आळवताना दिसत आहेत. वर्षानुवर्षे पर्यटकांचे खुल्या हाताने स्वागत करणाऱ्या युरोपवर ही वेळ का आली? 'क्रोएशियाचे मध्ययुगीन शहर डबरोव्हनिक हे शहर युरोपमधील सर्वाधिक गर्दीच्या शहरांपैकी एक आहे. ४१,००० लोकसंख्येच्या शहरामध्ये यंदा विक्रमी म्हणजेच १४ दशलक्ष पर्यटक आले. आता पर्यटकांना येथे येण्यास मनाई करण्यासाठी 'रिस्पेक्ट द सिटी' मोहिमेंतर्गत चाके असणाऱ्या टुरिस्ट लगेज बॅग्जवर बंदी घालण्यात आली आहे. १६ दशलक्ष लोकसंख्या असलेल्या स्पेनच्या बार्सिलोनामध्ये २०२२ मध्ये ९७ दशलक्ष पर्यटक आले होते. ग्रीसमधील रोड्स बेट, इटलीतील व्हेनिस आणि इतर अनेक ठिकाणी हीच स्थिती आहे. बंदरांमध्ये क्रूझ जहाजांना प्रवेश दिला जात नाहीये. रस्त्यांवर 'नो एंट्री'चे फलक लावले जाताहेत, म्हणजेच त्यांना या वाढत्या पर्यटक संख्येवरून आता पश्चात्ताप करण्याची वेळ आली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# दादा गटाचा शरद पवारांवर निशाणा!

## निवडणूक आयोगाच्या सुनावणीत केले गंभीर आरोप

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस कोणाची? यावर आज केंद्रीय निवडणूक आयोगात महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. खुद्द शरद पवार सुनावणीसाठी दिल्लीतील निवडणूक आयोगाच्या कार्यालयात हजर झाले होते. आज केवळ अजित पवार गटाने तब्बल दोन तास बाजू मांडली.**

अजित पवार गटाकडून थेट शरद पवारांवरच निशाणा साधण्यात आला आहे. अजित पवार गटाकडून शरद पवारांवर अनेक गंभीर आरोप करण्यात आले. शरद पवार मनमानी पद्धतीने पक्ष चालवतात, असा आरोप करत शरद पवारांनी केवळ एका पत्राद्वारे पक्षात केलेल्या नियुक्त्याच बेकायदा आहेत, असा दावा अजित पवार गटाकडून करण्यात आला. तसेच, शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदावरच अजित पवार गटाकडून आक्षेप घेण्यात आला. पाहुयात दोन तासांच्या सुनावणीत अजित पवार गटाने नेमके कोणते मुद्दे मांडले. थेट शरद पवारांवर निशाणा साधताना अजित पवार गटाने युक्तिवाद केला की, शरद पवार हे आपल्या मर्जीनुसार पक्ष चालवतात. पक्षात ते मनमानीपद्धतीने कारभार करतात. पक्षाच्या घटनेचे पालन व्यवस्थित होत नाही. केवळ एका पत्राद्वारे पक्षात नियुक्त्या कशा प्रकारे होऊ शकतात. अजित पवार गटाच्या या युक्तिवादावर शरद पवार गटाने जोरदार आक्षेप घेतला. शरद पवार गटाने म्हटले की, शरद पवार हे राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा आहेत. त्यांना पक्षाचे अधिकार आहेत. अजित पवार राष्ट्रवादीवर दावा करू शकत नाही. निवडणूक आयोगासमोर अजित पवार गटाने युक्तिवाद केला की, राष्ट्रवादीच्या 588 जणांच्या कार्यकारिणी सदस्यांची निवड ही शरद पवारांनीच केली होती. राष्ट्रीय अध्यक्ष आणि इतर निवडी या लोकशाहीला धरून नाहीत. शरद पवारांची अध्यक्षपदी निवडही बेकायदेशीर आहे. 10 आणि 11 सप्टेंबर रोजी दिल्लीमध्ये बैठक झाली. पण त्याच्या आधी 1 सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत ते आधीच जाहीर झाले होते. केवळ औपचारिकता म्हणून 10 सप्टेंबरची बैठक झाली. शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अजित पवार गटाच्या 9 आमदारांवर कारवाई करा, असे पत्र दिले आहे.



### आमदार आमच्याकडे अधिक

» शरद पवार यांनी जयंत पाटील यांची प्रदेशाध्यक्षपदी केलेली नियुक्तीही बेकायदेशीर आहे. कोणत्याही नियुक्त्या एका पत्राद्वारे कशा होऊ शकतात, असा सवाल अजित पवार गटाने केला. राष्ट्रवादी पक्षावर आपलाच दावा हे सांगताना अजित पवार गटाकडून सांगण्यात आले की, आमदारांची जास्त संख्या आमच्या बाजूने आहे. महाराष्ट्र विधानसभेचे 53 पैकी 42, विधानपरिषदेचे 9 पैकी 6 आणि नागालँडमध्ये 7 पैकी 7 असे 55 आमदार आमच्या पाठिशी आहेत. तर लोकसभेतील 5 पैकी 1 आणि राज्यसभेतील 4 पैकी 1 खासदार आमच्यासोबत आहे. 55 आमदार आणि 2 खासदारांचा आम्हाला पाठिंबा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राष्ट्रीय दर्जा गेला आहे. त्यामुळे आमदारांची संख्याच आता महत्त्वाची आहे. त्याआधारेच पक्ष कोणाचा? हे ठरवता येईल.

---

# बच्चू कडू यांचा शिंदे सरकारला टोला!

## राज्याला पाच उपमुख्यमंत्री, दोन मुख्यमंत्री करावेत

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्याला दोन उपमुख्यमंत्री लाभल्याने पंढरपुरच्या विठुरायाच्या महापूजेचा प्रश्न निर्माण झाला आहे. यंदा कार्तिकी यात्रेला विठ्ठलाची होणारी शासकीय पूजा अजित पवार करणार की देवेंद्र फडणवीस? याबाबतचा निर्णय न्याय आणि विधी विभाग करणार आहे. यावरुन प्रहार संघटनेचे नेते, आमदार बच्चू कडू यांनी सरकारला जोरदार टोला लगावला आहे.**

आमदार बच्चू कडू म्हणाले, राज्याच्या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी शासकीय पुजेला जावे. दोन दोन उपमुख्यमंत्री शासकीय पुजेला येत आहेत, याचा देवालाही किती आनंद होईल. मी तर म्हणतो राज्याला पाच उपमुख्यमंत्री करावे आणि या पाचही उपमुख्यमंत्र्यांनी शासकीय पुजेला जावे.

कारण हिंदू धर्मात पाच आकड्याला विशेष महत्त्व आहे. आमदार बच्चू कडू म्हणाले, राज्यात पाच उपमुख्यमंत्री केल्यानंतर मुख्यमंत्रीही दोन करावेत. राज्याला सध्या दोन मुख्यमंत्र्यांची गरज आहे. एक सार्वजनिक कामांसाठी तर एक व्यक्तिगत कामांसाठी. आता व्यक्तिगत कामांसाठी एका मुख्यमंत्र्यांची गरज आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंड करून शिंदे-फडणवीसांसोबत सत्तेत सहभागी झालेले अजित पवार हे लवकरच मुख्यमंत्री होणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नुकतेच एक विधान केले. अजित पवारांना जेव्हा मुख्यमंत्री बनवायचे असेल, तेव्हा त्यांना पाच वर्षांसाठी मुख्यमंत्री बनवू. जेव्हा संधी मिळेल तेव्हा त्यांना मुख्यमंत्री करू, असे फडणवीस म्हणाले होते. यावरूनही बच्चू कडू यांनी खोचक टोला लगावला आहे. सर्वच पक्ष भाजपमध्ये विलीन करावेत, असे बच्चू कडू म्हणाले आहेत. बच्चू कडू म्हणाले, एकीकडे आगामी निवडणुका एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली लढणार आणि दुसरीकडे अजित पवारांना मुख्यमंत्री करू बोलतात, हे कसे? त्यांच्या (भाजपच्या) मनात नेमके काय आहे हे सांगता येईल का. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली लढणार आणि मुख्यमंत्री अजित पवारांना करणार असतील तर मोठा संभ्रम आहे. ज्याच्या नेतृत्वात लढतो त्याला मुख्यमंत्री केले जाते, पण इथे उलटे होतेय. या दोन्ही पक्षांचे देवेंद्र फडणवीस ठरवणार. कोणाच्या नेतृत्वात निवडणूक लढवायची हे तेच ठरवणार आणि मुख्यमंत्री कोण होणार हे देखील तेच ठरवणार. त्यापेक्षा सगळे पक्ष भाजपमध्ये विलीन करावेत, हाच चांगला मार्ग आहे.



### सर्व पक्ष भाजपमध्ये विलीन करा

» राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंड करून शिंदे-फडणवीसांसोबत सत्तेत सहभागी झालेले अजित पवार हे लवकरच मुख्यमंत्री होणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नुकतेच एक विधान केले. अजित पवारांना जेव्हा मुख्यमंत्री बनवायचे असेल, तेव्हा त्यांना पाच वर्षांसाठी मुख्यमंत्री बनवू. जेव्हा संधी मिळेल तेव्हा त्यांना मुख्यमंत्री करू, असे फडणवीस म्हणाले होते. यावरूनही बच्चू कडू यांनी खोचक टोला लगावला आहे.

---

# दिल्लीत अचानक हालचाली वाढल्या!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व निवडणूक चिन्हाच्या मुद्यावरील निवडणूक आयोगाच्या सुनावणीच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत मोठ्या हालचाली वाढल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी अचानक काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी जावून त्यांच्याशी चर्चा केली.

काही वेळाने काँग्रेस नेते राहुल गांधी हे सुद्धा या चर्चेत सहभागी झाले. त्यामुळे पडद्यामागे मोठे राजकारण घडत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगात आज राष्ट्रवादीच्या कारभाऱ्याच्या मुद्दावर महत्त्वपूर्ण सुनावणी होणार आहे. त्यात राष्ट्रवादी पक्ष व निवडणूक चिन्ह कोणत्या गटाला द्यायचे याचा फैसला होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर एनसीपी अध्यक्ष शरद पवार दिल्लीत ठाण मांडून आहेत. त्यातच त्यांनी काँग्रेस अध्यक्षांच्या निवासस्थानी जावून त्यांच्याशी सल्लामसलत केली आहे. शरद पवार काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी प्रथम दाखल झाले. त्यानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी त्या ठिकाणी पोहोचले. सूत्रांच्या माहितीनुसार, खरगे यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीत आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने काही ठोस चर्चा करण्यात आली. या बैठकीला महाराष्ट्रातील काँग्रेस नेते माणिकराव ठाकरे यांच्यासह राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाडही उपस्थित होते. त्यामुळे या बैठकीत महाराष्ट्राच्या राजकारणाविषयी एखादी ठोस रणनीती ठरल्याची शक्यता आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीकोनातून जागावाटप कसे असावे, इंडिया आघाडीची रणनीती कशी असावी, यासंबंधीची चर्चा आजच्या बैठकीच्या केंद्रस्थानी होती अशी माहिती आहे. इंडिया आघाडीच्या सातत्याने बैठका होत आहेत. पण इंडियाच्या सभांची सुरुवात नेमकी कुठून करावी, याचा निर्णय अद्याप झाला नाही. या बैठकीत त्यावर निर्णय झाल्याची शक्यता आहे.

# 5 राज्यांबाबत निवडणूक आयोगाची बैठक!

## » 15 नोव्हेंबर ते 7 डिसेंबर या कालावधीत होऊ शकते मतदान

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि मिझोराम या देशातील 5 राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. याबाबत दिल्लीत निवडणूक आयोगाची बैठक सुरू आहे. ज्यामध्ये पाचही राज्यांतील निवडणूक निरीक्षकांचा समावेश आहे. या बैठकीला मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमारही उपस्थित आहेत.**

मीडिया रिपोर्ट्सनुसार, या राज्यांमध्ये 15 नोव्हेंबर ते 7 डिसेंबरपर्यंत मतदान होऊ शकते. तारखा 8 ऑक्टोबरनंतर कधीही जाहीर केल्या जाऊ शकतात. 2018 मध्ये 6 ऑक्टोबर रोजी तारखा जाहीर करण्यात आल्या.

निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी सांगितले की, राजस्थान, मध्य प्रदेश, मिझोराम आणि तेलंगणामध्ये 2018 मध्ये गेल्या वेळेप्रमाणे एकाच टप्प्यात मतदान होऊ शकते. छत्तीसगडमध्ये 2018 मध्ये दोन टप्प्यांत मतदान होण्याची शक्यता आहे. पाच राज्यांमध्ये मतदानाच्या तारखा बदलू शकतात. पाचही राज्यांतील मतमोजणी 10 ते 15 ऑक्टोबरदरम्यान एकाच वेळी होऊ शकते. ज्या पाच राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत, त्यापैकी




चार राज्यांमध्ये पुरुषांपेक्षा महिला मतदारांची संख्या अधिक आहे. मिझोराम विधानसभेचा कार्यकाळ या वर्षी 17 डिसेंबर रोजी संपत आहे. भाजपचा मित्रपक्ष मिझो नॅशनल फ्रंट (MNF) ईशान्येकडील राज्यात सत्तेत आहे. तेलंगणा, राजस्थान, छत्तीसगड आणि राजस्थानच्या विधानसभांचा कार्यकाळ पुढील वर्षी जानेवारीमध्ये वेगवेगळ्या तारखांना संपत आहे. तेलंगणामध्ये के. चंद्रशेखर राव यांच्या नेतृत्वाखालील भारत राष्ट्र समिती (BRS) ची सत्ता आहे, तर मध्य प्रदेशात भाजपची सत्ता आहे. छत्तीसगड आणि राजस्थानमध्ये काँग्रेसची सरकारे आहेत.

### तारखा निश्चित करण्याचे प्रयत्न

» निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी सांगितले की, राजस्थान, मध्य प्रदेश, मिझोराम आणि तेलंगणामध्ये 2018 मध्ये गेल्या वेळेप्रमाणे एकाच टप्प्यात मतदान होऊ शकते. छत्तीसगडमध्ये 2018 मध्ये दोन टप्प्यांत मतदान होण्याची शक्यता आहे. पाच राज्यांमध्ये मतदानाच्या तारखा बदलू शकतात. पाचही राज्यांतील मतमोजणी 10 ते 15 ऑक्टोबरदरम्यान एकाच वेळी होऊ शकते.

पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर करण्यापूर्वी निवडणूक आयोगाने राजस्थान, मिझोराम, मध्य प्रदेश, तेलंगणा आणि छत्तीसगडमधील निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी रणनीती आखण्यासाठी निवडणूक आयोगाने शुक्रवारी आपल्या निरीक्षकांची बैठक बोलावली आहे. निवडणूक आयोगाच्या पोलीस आणि निरीक्षकांच्या दिवसभराच्या बैठकीचे उद्दिष्ट आदर्श संहितेची प्रभावीपणे अंमलबजावणी होते याची खात्री करण्यासाठी धोरण सुव्यवस्थित करणे आहे.

# आमदारांना संपूर्ण भाषण स्वातंत्र्य!

## » संसदेत अपमानास्पद वक्तव्य करणे गुन्हा नाही

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**संसदेत अवमानकारक वक्तव्ये करणे गुन्हा मानण्याचा प्रस्ताव सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला आहे. सभागृहात राजकीय विरोधकांबद्दल अवमानकारक विधान करणे हा गुन्हा नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी (5 ऑक्टोबर) सांगितले. संसद आणि विधानसभांमधील बदनामीकारक विधानांसह प्रत्येक प्रकारच्या कामाला कायद्यातून सूट देऊ नये, असे सर्वोच्च न्यायालयासमोरील प्रस्तावात म्हटले होते. जेणेकरून गुन्हेगारी कटाखाली असे करणाऱ्यांवर दंडात्मक कायदे लागू करता येतील.**

यावर सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, सभागृहात काहीही बोलल्यास खासदार आणि आमदारांवर कायदेशीर कारवाई करता येणार नाही. संसद आणि विधानसभेच्या सदस्यांना सभागृहात बोलण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे.

झारखंड मुक्ती मोर्चाच्या आमदार सीता सोरेन यांच्याविरुद्ध 'मतांच्या बदल्यात लाच' घेण्याच्या आरोपाशी संबंधित खटल्याच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने ही टिप्पणी केली. मुख्य न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती एएस बोपण्णा, एमएम सुंदरेश, पीएस नरसिम्हा, जेबी पार्डीवाला, संजय कुमार आणि मनोज मिश्रा यांच्या सात न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. वास्तविक, सीता सोरेन यांच्यावर 2012 मध्ये झालेल्या राज्यसभा निवडणुकीत मतदानाच्या बदल्यात लाच घेतल्याचा आरोप आहे. सीता सोरेन यांनी त्यांच्या बचावात असा युक्तिवाद केला की त्यांना संविधानाच्या अनुच्छेद 194(2) नुसार सभागृहात 'काहीही बोलणे किंवा मत देणे' अशी प्रतिकारशक्ती आहे. सीता सोरेन यांची बाजू ज्येष्ठ वकील राजू रामचंद्रन यांनी सर्वोच्च न्यायालयात मांडली. नुकतेच लोकसभेत भाजप खासदार



### सभागृहाच्या कामकाजाशी संबंध नाही


» तथापि, ॲटर्नी जनरल आर वेंकटरामानी यांनी सीता सोरेन यांची केस इतर प्रकरणांपेक्षा वेगळी असल्याचे वर्णन केले. ते म्हणाले की, राज्यसभा निवडणुकीच्या मतदानाचा सभागृहाच्या कामकाजाशी संबंध नाही. त्यामुळे सीता सोरेन यांनी राज्यसभा निवडणुकीत मतदानासाठी लाच घेतल्याचे प्रकरण कायदेशीर कक्षेत येते.

रमेश बिधुरी यांनी बसपा खासदार दानिश अली यांच्या विरोधात केलेल्या अपमानास्पद विधानाचा संदर्भ देत ते म्हणाले की, मतदान किंवा भाषणाशी संबंधित कोणत्याही गोष्टीसाठी, मग ती लाचखोरी असो किंवा कट असो, कारवाईपासून मुक्तता पूर्ण आहे. तथापि, ॲटर्नी जनरल आर वेंकटरामानी यांनी सीता सोरेन यांची केस इतर प्रकरणांपेक्षा वेगळी असल्याचे वर्णन केले. ते म्हणाले की, राज्यसभा निवडणुकीच्या मतदानाचा सभागृहाच्या कामकाजाशी संबंध नाही. त्यामुळे सीता सोरेन यांनी राज्यसभा निवडणुकीत मतदानासाठी लाच घेतल्याचे प्रकरण कायदेशीर कक्षेत येते. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी असा युक्तिवाद केला की कलम 105(2) आणि 194(2) अंतर्गत लाचखोरीला कधीही सूट दिली जाऊ शकत नाही. जरी गुन्हा संसद किंवा विधानसभेतील भाषण किंवा मतदानाशी संबंधित असला तरी तो सदनाबाहेर केला जातो. दोन दिवसांच्या सुनावणीनंतर सुप्रीम कोर्टाने याप्रकरणी आपला निर्णय राखून ठेवला आहे.

# राघव चड्ढांना बंगला रिकामा करण्याचे आदेश

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



आम आादमी पार्टीचे पंजाबमधील राज्यसभेचे खासदार राघव चड्ढा यांना पटियाला हाऊस कोर्टाने दणका दिला आहे. सरकारी बंगला रिकामा न केल्यामुळे त्यांना न्यायालयाने सुनावलं आहे. तसेच त्यांना टाइप ७ बंगला रिकामा करण्याचे आदेश दिले आहेत. राघव चड्ढा यांच्या बंगल्याचं प्रकरण पटियाला हाऊस कोर्टात पोहोचलं होतं. यावेळी राज्यसभा सचिवालयाच्या वकिलांनी कोर्टात युक्तिवाद केला की राघव चड्ढा हे राज्यसभेचे खासदार आहेत. नियमानुसार त्यांना टाइप ६ बंगला मिळायला हवा. तोच त्यांचा अधिकार आहे. टाइप ७ बंगल्यात राहण्याचा त्यांना अधिकार नाही. यासंबंधी राज्यसभा सचिवालयाने त्यांना बंगला रिकामा करण्याचे आदेश दिले होते. परंतु. बंगला रिकामा करण्याऐवजी खासदार राघव चड्ढा पटियाला हाऊस कोर्टात पोहोचले. राघव चड्ढा यांनी याचिका दाखल केल्यानंतर याप्रकरणी पटियाला हाऊस कोर्टात आज (६ ऑक्टोबर) सुनावणी झाली. पटियाला हाऊस कोर्टात गेल्यानंतर राघव चड्ढा यांना राज्यसभा सचिवालयाने बंगला रिकामा करण्याचे जे आदेश दिले होते, त्यावर स्थगिती दिली होती. आंदेशांवरील ही स्थगिती पटियाला हाऊस कोर्टाने आज हटवली आणि चड्ढा यांना बंगला रिकामा करण्याचे आदेश दिले. तसेच राज्यसभा सचिवालयाने पाठवलेली नोटीस बरोबर असल्याचं म्हटलं आहे. कोर्टाने म्हटलं आहे की, राज्यसभेचे सदस्य म्हणून राघव चड्ढा त्यांच्या संपूर्ण कार्यकाळात सरकारी निवासस्थानावर ताबा ठेवण्याचा अधिकार आहे असं म्हणू शकत नाहीत. शासकीय निवासस्थानांचं वाटप हा त्यांना दिलेला विशेषाधिकार आहे. राज्यसभा सचिवालयाने राघव चड्ढा यांना पूर्वी नवी दिल्लीत टाइप ७ बंगला दिला होता. परंतु, हा बंगला त्याच खासदारांना दिला जातो जे यापूर्वी केंद्रीय मंत्री झाले आहेत, ज्यांनी राज्यपालपद भूषवलं आहे किंवा एखाद्या राज्याचं मुख्यमंत्रीपद भूषवलं आहे.

# रिल्स स्टारच्या कानातून हेमांगीनं काढला जाळ !



मराठी मनोरंजन विश्वामध्ये अभिनेत्री हेमांगीची सोशल मीडियावर नेहमीच चर्चेत असते. आपल्या अभिनयामुळे तिनं चाहत्यांची पसंती मिळवली आहे. अशावेळी हेमांगी ही देखील तिच्या प्रतिक्रियांमुळे नेटकऱ्यांच्या प्रतिक्रियेचा विषय असल्याचे दिसून आले आहे. आता हेमांगीनं सोशल मीडियावरून जो व्हिडिओ व्हायरल केला आहे त्यातून तिनं सध्याचे ते सोशल मीडिया इन्फ्ल्युंसर आहेत त्यांच्यावर वेगळ्या शैलीत टीका केली आहे. ती पोस्ट नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. खासकरुन फॅशन विषयी रिल्स करणाऱ्यांचा हेमांगीनं चांगलाच समाचार घेतला आहे. तिनं त्यांची स्पष्ट शब्दांत कानउघाडणीही केली आहे. हेमांगी त्या व्हिडिओमध्ये म्हणते, मला एक प्रश्न पडला आहे की, सोशल मीडियावरच्या ज्या फॅशन इन्फ्लुंसरच आणि स्टायलिस्ट असतात, त्या प्रत्येकवेळी नवीन काय आलं ते सांगत असतात. घरात त्या वस्तूंचे आलेले बॉक्स अनबॉक्स करतानाचे व्हिडिओ दाखवणे आणि प्रेक्षकांना सांगणे हे मी पाहते. मला त्यांना एक विचारायचे आहे की, एवढे कपडे तुम्ही मागवता पण नंतर ते पुन्हा वापरता का, मुळात एवढे कपडे ठेवता कुठे.... मला तुमच्याकडे पाहिल्यावर तुम्हाला विचारावेसे वाटते की, तुम्ही काय करता आणि काय करायचं तुमचं, सहा सहा महिने मी शॉपिंग करत नाही. ऑनलाईन शॉपिंगही वर्षातून एकदा करते. तरीसुद्धा माझ्याकडे जे कपडे आहेत त्याचा मला त्रास होतो. आणि तुम्ही असे का करता, तुम्ही करता काय एवढ्या कपड्यांचे असा प्रश्न हेमांगीनं त्या पोस्टमधून यापूर्वी देखील हेमांगी तिच्या पोस्ट आणि व्हिडिओमुळे चर्चेत आल्याचे दिसून आले आहे.

# राजनं उर्फीला बोलायला नको होतं!



टीव्ही मनोरंजन क्षेत्रापेक्षा सोशल मीडियावरच जास्त चर्चेत राहणाऱ्या सेलिब्रेटींमध्ये उर्फीचे नाव घेतले जाते. एक दिवस असा जात नाही री ज्यादिवशी उर्फीवरुन वाद होत नाही. ती तिच्या अतरंगी फॅशनमुळे चर्चेत येते. त्यावरुन मोठ्या प्रमाणावर वाद रंगला होता. पण ऐकेल ती उर्फी कसली हे दिसून आले आहे. काही दिवसांपूर्वी उर्फीच्या प्रकरणावरुन एका वेगळ्याच राजकीय चर्चेला सुरुवात झाली होती. भाजपच्या महिला पदाधिकारी विरोधात उर्फी जावेद असा तो वाद सोशल मीडियावर रंगला होता. त्यात उर्फीनं भाजप महिला पदाधिकाऱ्याला चांगलेच सुनावले होते. आम्ही कसं राहायचं हे तुम्ही आम्हाला सांगण्याची गरज नाही. आम्हाला वाट्रेल ती वेशभूषा करु त्यावरुन कुणी काही बोलू नये अशा शब्दांत उर्फीनं तिची भूमिका मांडली होती. उर्फीनं आता शिल्पाचा पती राज कुंद्रावर आगपाखड केली आहे. त्याला कारण म्हणजे राजनं उर्फीवर केलेली कमेंट. यामुळे उर्फीचा संताप झाला आहे. एका मुलाखतीमध्ये राजला त्याच्या लोकप्रियतेवरुन प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर तो म्हणाला, गेल्या काही दिवसांत मला खूपच वेगळ्या प्रसंगांना सामोरं जावं लागलं होतं. यासगळ्यात मला मोठी साथ लोकांची लाभली. त्यांचा पाठींबा होता. मी आणि उर्फी जावेद आमच्या दोघांना ती साथ मिळत होती. मी जिथं जाईल तिथे माझ्या तोंडावर मास्क असतो.त्याची मला सवय झाली आहे. माझे कुटूंबीय देखील काही गोंधळात पडताना दिसत आहेत.माझी मुलं ज्यांच्या डोक्यावर हेल्मेट पाहतात त्यांना पपा, पपा अशी हाक मारु लागतात. काही दिवसांपूर्वी मुलं पॉवर रेंजर्स पाहत होते तेव्हा ते त्यांच्या आईला म्हटले की, आई आपले पपा टीव्हीवर आले. त्यानंतर मात्र राजनं जे वक्तव्य केले त्यामुळे तो चर्चेत आल्याचे दिसून आले आहे.

# ऐश्वर्याला 'बॉडी शेमिंग'चा करावा लागला सामना!

माजी विश्वसुंदरी आणि बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री ऐश्वर्या रॉयचा काही दिवसांपूर्वी एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यात तिनं तिच्या भाचीसोबत नव्या नवेली नंदाबरोबर रॅम्प वॉक केला होता.त्यावर तिला आलेल्या प्रतिक्रिया मात्र वादाचा विषय ठरताना दिसत आहे. गेल्या दोन दशकांहून अधिक ऐश्वर्यानं तिच्या नावाची वेगळी ओळख निर्माण केली आहे.ऐश्वर्याच्या नावाला बॉलीवूड, हॉलीवूड आणि दाक्षिणात्य चित्रपट विश्वामध्ये मोठा मान आहे. काही महिन्यांपूर्वी तिचा पीएस २ नावाचा चित्रपट येऊन गेला होता. त्या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई केली होती. प्रख्यात दिग्दर्शक मणिरत्नम यांच्या या चित्रपटानं प्रेक्षकांची वाहवा मिळवली होती. नेटकऱ्यांना एखाद्या सेलिब्रेटीला ट्रोल करण्यासाठी कोणतंही कारण पुरतं. त्यात ऐश्वर्याला देखील अनेकांनी बॉडी शेमिंगवरुन ट्रोल केले आहे. ऐश्वर्या आता तू कशी झाली आहेस, अशा प्रकारच्या प्रतिक्रिया दिल्या आहे. तिनंही कुणाचं ऐकून न घेता सरळपणे ट्रोल करणाऱ्यांना सुनावले आहे. मी कशाप्रकारचे कपडे परिधान करावेत हे सांगणारे तुम्ही कोण, माझे आयुष्य मला हवे तसे जगण्याचा अधिकार नाही का, ही गोष्ट तुम्ही कधी लक्षात घेणार असा प्रश्नही ऐश्वर्यानं ट्रोल करणाऱ्यांना केला आहे.



# आमीरच्या मुलीचे कौतुक

अभिनेता आमीर खान आणि सलमान खान एकमेकांचे खूप चांगले मित्र समजले जातात. या मैत्रीमुळे सलमान आमीरची मुलगी आयरा हिच्या आगत्सू फाऊंडेशनचे प्रमोशन करत आहे. सलमानने नुकताच त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्यात तो इमोशनल हायजीनवर काम करण्याविषयी बोलला. इन्स्टा स्टोरीमध्ये शेअर करताना त्याने लिहिले, 'आश्चर्यकारक आहे मित्रा... मुले मोठी झाली आहेत, खूप मजबूत आणि हुशारी झाली आहेत.. खूप प्रेम... बेटा तुला आशीर्वाद..' आयरा 2019 पासून मानसिक आरोग्यावर काम करत आहे. ती स्वतः एकेकाळी डिप्रेशनमध्ये होती. नंतर, 2021 मध्ये तिने आई आणि आमीरची पहिली पत्नी रीना दत्ता यांच्या मदतीने आगत्सू फाऊंडेशन सुरू केले. यापूर्वी 2017 मध्ये आयराने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करून ती डिप्रेशनमध्ये असल्याची माहिती

# पाच जणींनी 'पुरुषीपणा'ला दिलं मोठं आव्हान

एका अर्थी किरण बुलानी यांचे कौतुक करायला हवे की, त्यानं एका आगळ्या वेगळ्या विषयावर त्यानं भाष्य करण्याचा प्रयत्न केला आहे. महिला आणि त्यांचे लैंगिक स्वातंत्र्य. असा तो विषय असून त्यावर त्यानं विनोदाच्या माध्यमातून केलेलं भाष्य लोकप्रिय होताना दिसत आहे. म्हणून की काय थँक यू फॉर कमिंग चाहत्यांना भावताना दिसत आहे. यापूर्वी बॉलीवूडमध्ये अँग्री इंडियन गॉडेस, पार्श्ड आणि लिपस्टिक अंडर माय



बुरखा सारख्या चित्रपटांतून महिलांच्या सक्षमीकरणाविषयी प्रभावीपणे भाष्य करण्यात आले होते. अलीकडे भूमी आणि सोनाक्षी सिन्हा यांचा डबल एक्स एल नावाचा जो चित्रपट आला होता त्यानंही प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले होते. बॉडी शेमिंग सारख्या महत्वाच्या मुद्द्यावर या चित्रपटातून भाष्य करण्यात आले होते. तुम्ही जेव्हा थँक यू फॉर कमिंग पाहण्यासाठी जाता तेव्हा दिग्दर्शकानं कित्येक महत्वाच्या गोष्टी विनोदाच्या माध्यमातून तुम्हाला सहज सोप्या पद्धतीनं सांगितल्या आहेत.

# भारताचे हॉकीत सुवर्ण युग!

## » जपानचा 5-1 ने फडशा पाडत इंडियाची 'गोल्ड'वर मोहर

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**हँगझोऊ येथे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या 13 व्या दिवशी भारताने हॉकीमध्ये सुवर्णपदक जिंकले. भारतीय पुरुष हॉकी संघाने सुवर्णपदकाच्या लढतीत जपानचा 5-1 असा पराभव केला. भारताकडून मनप्रित सिंगने 25व्या मिनिटाला, हरमनप्रित सिंगने 32व्या आणि 59व्या मिनिटाला, अमित रोहिदासने 36व्या मिनिटाला आणि अभिषेकने 48व्या मिनिटाला गोल केले. जपानकडून तनाकाने 51व्या मिनिटाला संघासाठी एकमेव गोल केला. या विजयासह भारत पॅरिस ऑलिम्पिक 2024 साठी पात्र ठरला आहे.**



दुसरीकडे, चाचण्यांशिवाय भारताकडून आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरलेला कुस्तीपटू बजरंग पुनिया याला कांस्यपदकाच्या लढतीत जपानच्या यामागुचीविरुद्ध एकतर्फी झालेल्या सामन्यात 10-0 असा पराभव पत्करावा लागला. भारताने आज 1 सुवर्ण, 2 रौप्य आणि 6 कांस्य पदकांसह एकूण 8 पदके जिंकली आहेत. एकूण पदकांची संख्या 95 वर पोहोचली आहे. कुस्तीमध्ये महिलांच्या 62 किलो वजनी गटानंतर भारताला 76 किलोग्रॅम फ्रीस्टाइलमध्येही कांस्यपदक मिळाले. भारताच्या किरणने मंगोलियाच्या गानबत अरियुंजरगलचा पराभव करून कांस्यपदक जिंकले. दुसरीकडे, भारताच्या अमनने पुरुषांच्या फ्रीस्टाइल 57 किलोग्रॅम प्रकारात कांस्यपदक जिंकले. त्याचवेळी ब्रिज गेमच्या सांघिक अंतिम फेरीत भारताने रौप्यपदक पटकावले. भारतीय पुरुष संघाला तिरंदाजीच्या रिकर्व्ह सांघिक स्पर्धेच्या अंतिम फेरीत दक्षिण कोरियाविरुद्ध पराभव पत्करावा लागल्याने रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. त्याचवेळी 21 वर्षीय सोनम मलिकने 62 किलो वजनी गटात कांस्यपदकाच्या लढतीत चीनच्या जिया लाँगचा पराभव केला. यापूर्वी भारतीय महिला संघाने उपांत्य फेरीत थायलंडविरुद्ध पराभूत होऊन कांस्यपदक मिळवले होते. तिरंदाजी रिकर्व्ह महिला संघानंतर एचएस प्रणॉयने बॅडमिंटन पुरुष एकेरीत कांस्यपदक मिळवले. हँगझोऊ येथे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारत 100 पदकांचा टप्पा गाठण्यासाठी सज्ज झाला आहे. 9 पदके जिंकल्यानंतर भारताच्या पदकांची संख्या 95 झाली आहे. यासह भारताने 4 क्रीडा प्रकारांत 7 पदके निश्चित केली आहेत. यानुसार भारत 100 पदके जिंकण्याच्या जवळ आहे.

### भारतासाठी कोणी-कोणी केले गोल

» भारताने जपानवर दणदणीत विजय मिळवला आहे. भारताने दुसऱ्या क्वार्टरमध्ये पहिला गोल केला. यानंतर तिसऱ्या क्वार्टर आणि चौथ्या क्वार्टरमध्ये भारताने प्रत्येकी दोन गोल केले. भारताकडून मनप्रीत सिंग (२५वे मिनिट), अमित रोहिदास (३६वे मिनिट), कर्णधार हरमनप्रीत सिंग (३२वे मिनिट) आणि अभिषेक (४८वे मिनिट) यांनी गोल केले. जपानसाठी तनाका सेरेनने एकमेव गोल केला.

### भारतीय संघ संपूर्ण स्पर्धेत अपराजित

» सध्या सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय संघ जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. त्याने ग्रुप स्टेजमधील पाचही सामने जिंकले. टीम इंडियाने ग्रुप फेरीत ५८ गोल केले होते. त्याच्याविरुद्ध केवळ पाच गोल झाले. भारताने उपांत्य फेरीतही पाच गोल केले. मात्र, दक्षिण कोरियालाही तीन गोल करण्यात यश आले. भारताने अंतिम फेरीत पाच गोल केले आणि त्यांच्याविरुद्ध एकच गोल होऊ शकला. म्हणजे संपूर्ण स्पर्धेत भारताने ६८ गोल केले आणि त्यांच्याविरुद्ध फक्त ९ गोल झाले.

---

# पाकिस्तानच्या फलंदाजांची दमछाक

**नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

आयसीसी क्रिकेट विश्वचषका २०२३ चा दुसरा सामना पाकिस्तान आणि नेदरलँड्स यांच्यात खेळला जात आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर हा सामना खेळला जात आहे. या सामन्यात नेदरलँड्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. नेदरलँड्स संघाने चांगली सुरुवात केली आणि अवघ्या ३८ धावांवर पाकिस्तानचे ३ विकेट्स घेतल्या. मात्र, त्यानंतर मोहम्मद रिझवान आणि सौद शकील यांनी पाकिस्तानचा डाव सांभाळत सन्मानजनक धावसंख्या उभारली. मात्र, पाकिस्तानचा संघ पूर्ण ५० षटकेही खेळू शकला नाही. पाकिस्तानचा संपूर्ण संघ ४९ षटकांत २८६ धावा करून ऑलआऊट झाला. पाकिस्तानकडून सर्वाधिक धावा मोहम्मद रिझवानने केल्या. त्याने ७५ चेंडूत ६८ धावा केल्या आणि सौद शकीलने ५२ चेंडूत ६८ धावा केल्या. याशिवाय मोहम्मद नवाजने ३९ धावांची तर शादाब खानने ३२ धावांची खेळी खेळली. या ४ फलंदाजांशिवाय पाकिस्तानच्या एकाही फलंदाजाला २० धावाही करता आल्या नाहीत. बाबर आझमलाही या सामन्यात केवळ ५ धावा करता आल्या. अशा प्रकारे पाकिस्तानने ४९ षटकात २८६ धावा केल्या आणि सर्वबाद झाला. नेदरलँड्सच्या कर्णधाराने आपल्या ८ गोलंदाजांचा वापर केला आणि बास डी लीडेने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या.

# ऑस्ट्रेलियाविरुद्ध गिल खेळणार नाही?

## » टीम इंडियाचा सलामीवीर शुभमन गिलला डेंग्यू

**नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**भारतीय संघ रविवार ८ ऑक्टोबरपासून ऑस्ट्रेलियाविरुद्ध विश्वचषक मोहिमेला सुरुवात करणार आहे. तत्पूर्वी, ६ ऑक्टोबर रोजी सकाळी भारतीय चाहत्यांना त्रास देणारी एक बातमी समोर आली होती. त्यानुसार शुभमन गिल हा डेंग्यू पॉझिटिव्ह आढळून आला. तो ऑस्ट्रेलियाविरुद्धचा पहिला सामना खेळू शकणार नाही का, अशीही चर्चा होती. या सर्व अटकळांच्या दरम्यान मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडचे एक मोठे वक्तव्य समोर आले आहे.**




टीम इंडियाच्या मुख्य प्रशिक्षकाने शुक्रवारी याबाबत मोठी अपडेट दिली. त्यांच्या निवेदनाची माहिती क्रिकेट विश्वचषकाच्या वेबसाइटवरून मिळाली आहे. ज्यामध्ये त्यांनी सांगितले की, गिलला डेंग्यूची लागण झाल्याचे आढळून आले असले, तरी तो अद्याप पहिल्या सामन्यातून पूर्णपणे बाहेर झालेला नाही. द्रविडने असेही सांगितले की, बीसीसीआयची वैद्यकीय टीम त्याच्या काळजीत गुंतलेली आहे. संघाने त्याला अद्याप पूर्णपणे वगळलेले नाही. याबाबत संपूर्ण माहिती देताना राहुल द्रविड म्हणाला, 'आज (शुक्रवारी) त्याला बरे वाटत आहे. वैद्यकीय पथक दररोज त्यांची काळजी घेत आहे. अजून जवळपास ३६ तास बाकी आहेत. काय निर्णय घेतला जाऊ शकतो ते नंतर पाहू. मात्र आज त्यांच्या तब्येतीत थोडी सुधारणा झाली आहे. वैद्यकीय पथकाने अद्याप त्याला पूर्णपणे नाकारलेले नाही. आम्ही दिवसेंदिवस त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवत आहोत. आता त्यांची प्रकृती कशी आहे ते उद्या पाहू. शुबमन गिल खेळू शकत नसेल, तर त्याच्या जागी इशान किशनला संधी मिळू शकते. सध्या याची शक्यता कमी आहे. मात्र, गिल खेळला नाही, तर इशान रोहितसोबत सलामी येऊ शकतो. सध्या इशान किशनला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळवताना दिसत नव्हता. केएल राहुल पूर्णपणे तंदुरुस्त असून तो विकेटकीपिंग करेल. अशा परिस्थितीत गिल खेळला नाही, तर त्याचा जिवलग मित्र इशान किशनला लॉटरी लागू शकते.